ePaper

## भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्यांना उमेदवारी हीच मोदींची गॅरंटी ; संजय राऊत



| वर्ष - 7 | अंक - 287 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- मैदानात कधी परतणार शामी?
- आलिया भट्टचा भन्नाट डान्स
- हर्षवर्धन यांचा राजकारणाला राम-राम
- ४०० जागा कसे जिंकतात तेच पाहतो


www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 4 मार्च 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## महापालिका कर संकलन विभागाचे नियोजन

# विक्रमी पाणीपट्टी वसुलीचा निर्धार!

## » शहरात प्रथमच 63 कोटी रुपयांची पाणीपट्टी वसुली

। पिंपरी । महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने कर संकलन आणि पाणी पट्टी एकत्र वसूल करण्याचा निर्णय यशस्वी होताना दिसत आहे. त्यामुळे आत्तापर्यंत महापालिकेच्या इतिहासातील प्रथमच 63 कोटी रुपयांची पाणीपट्टी वसुली झाली आहे. तसेच उर्वरित 28 दिवसांत विक्रमी पाणी पट्टी वसूल करण्याचा मानस कर संकलन व कर आकारणी विभागाचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी व्यक्त केला आहे.**







पिंपरी-चिंचवड शहरात निवासी, व्यावसायिक आणि औद्योगिक अशा तीन लाख 11 हजार 391 अधिकृत नळ जोडधारक आहेत. महापालिकेला पाणी पुरवठा विभागकडून म्हणावे तसे उत्पन्न मिळत नसून थकबाकीही वाढत होती. एकीकडे मिळकत करातून दिवसेंदिवस उत्पन्न वाढत असताना पाणीपट्टी मात्र थकीत राहत असल्याने पालिकेच्या उत्पन्नावर परिणाम होत होता. त्यामुळे महापालिका प्रशासनाकडून पाणीपट्टी वसुली ही कर आकारणी व कर संकलन विभागाकडे देण्यासाठी चाचपणी सुरू केली.

राज्यातील काही महापालिकांमध्ये पाणीपट्टी वसुली आणि कर वसुलीचे एकत्रित कामकाज चालते. त्या महापालिकांचा पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने अभ्यास केला. आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांनी यासाठी पुढाकार घेतला.

कर संकलन आणि पाणी पुरवठा विभागांमधील अधिकारी, मीटर निरीक्षकांच्या बैठका घेतल्या. 2023-24 या आर्थिक वर्षापासून कर संकलन आणि पाणी पट्टी एकत्र वसुल करण्याचा अतिशय धाडसी निर्णय आयुक्त शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांनी घेतला. हा निर्णय यशस्वी होत असून आत्तापर्यंत तब्बल 63 कोटींची पाणी पट्टी वसूल करण्यात महापालिकेला यश आले आहे.

### 250 पेक्षा अधिक नळजोड खंडित...

महापालिकेच्या वतीने कर संकलन विभागाच्या वतीने कर वसुली जोरदार सुरू असतानाच 2023-24 या आर्थिक वर्षात पाणी पट्टी वसुलीकडे आपला मोर्चा वळवला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून आणि क्षमता असूनही पाणी पट्टी न भरणाऱ्या 250 पेक्षा जास्त मालमत्ता धारकांचे नळजोड खंडित करण्याची धडाका मीटर निरीक्षक आणि कर संकलन विभागाच्या पथकाने लावला आहे. या कारवाईमुळे नागरिकांनी पाणी पट्टी भरण्यास प्राधान्य देऊ लागले आहेत. त्याचबरोबर कर संकलन विभागालाही मालमत्ता कर वसूलीसाठीही फायदा होताना दिसत आहे.

### वसुलीसाठी मीटर निरीक्षक 'ॲक्शन मोडवर'...

कर संकलन आणि पाणी पट्टी एकत्र वसुल करण्याबाबत मीटर निरीक्षकांना सुरुवातीला काही प्रमाणात साशंकता होती. आता मात्र पाणी पट्टी वसुलीसाठी कर संकलन विभागाचे पथक, मीटर निरीक्षकांचे पथक आणि जोडीला एमएसएफ जवानांची मदत मिळत आहे. त्यामुळे मीटर निरीक्षक 'ॲक्शन मोडवर' आले असून आर्थिक वर्षातील उर्वरित 28 दिवसांत जास्तीत जास्त पाणी पट्टी वसूल करण्यासाठी त्यांनी कंबर कसली आहे.



"कर संकलन विभागाचे उत्पन्न वाढत असताना पाणी पट्टीच वसूल होत नव्हती. त्यामुळे राज्यातील काही महापालिकेच्या कर संकलन आणि पाणी पट्टी एकत्र वसूल करण्याच्या निर्णयाचा सुक्ष्म पध्दतीने अभ्यास केला. त्यानुसार कर संकलन विभागाकडे मीटर निरीक्षक वर्ग करण्यात आले. त्याचे फलित म्हणूनपाणी पट्टी वसुलीचा आलेख वाढत आहे. तसेच आगामी 2024-25 या आर्थिक वर्षात मालमत्ता कर आणि पाणी पट्टीची बिले एकत्रित देण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे नागरिकांना मालमत्ता कर आणि पाणी पट्टी भरण्यास सुलभ होणार आहे. तसेच 31 मार्चपर्यंत 75 कोटींची पाणी पट्टी वसूल करण्याचा आमचा मानस आहे.

**–प्रदीप जांभळे-पाटील,**
अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.

### 128 कोटींची पाणी पट्टी थकीत..

**» महापालिकेचे शहरात आठ क्षेत्रीय कार्यालये आहेत . या आठही क्षेत्रात कार्यालया अंतर्गत चालू मागणी आणि जुनी अशी 128 कोटी 38 लाख 74 हजार रुपयांची थकबाकी आहे. ही चालू मागणी आणि थकबाकी वसूल करण्याचे मोठे आव्हान कर संकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांच्यापुढे असणार आहे.**

# यंदा देशात गव्हाचे उत्पादन उच्चांकी?

## » गव्हाचे उत्पादन 1140 लाख टनांवर जाण्याचा अंदाज

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**देशातील प्रमुख गहू उत्पादक राज्यांत फेब्रुवारी अखेरपर्यंत थंडी कायम राहिली. गहू उत्पादक राज्यांत अवकाळीसारख्या नैसर्गिक आपत्तींचा फारसा फटका बसला नाही. त्यामुळे यंदाच्या रब्बी हंगामात उच्चांकी ११४० लाख टन गहू उत्पादनाचा अंदाज केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय आणि भारतीय अन्न महामंडळाकडून व्यक्त केला जात आहे.**



गेल्या वर्षी फेब्रुवारी महिन्यापासूनच उत्तर भारताला उष्णतेच्या झळांचा सामना करावा लागला होता. यंदाही हवामान विभागाने उत्तर भारताला उष्णतेच्या झळांचा सामना करावा लागण्याचा अंदाज व्यक्त केला होता. प्रत्यक्षात उत्तरेकडून येणाऱ्या थंड हवेच्या झंझावातामुळे गहू उत्पादक पंजाब, हरियाणा, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये फेब्रुवारीअखेरपर्यंत थंडीचे वातावरण राहिले. अवकाळी आणि गारपिटीसारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे पिकाचे नुकसान होण्याचे प्रमाणही कमी राहिले आहे. त्यामुळे यंदाच्या रब्बी हंगामात गव्हाचे उत्पादन ११४० लाख टनांवर जाण्याचा अंदाज केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री अर्जुन मुंडा यांनी व्यक्त केला आहे. या अंदाजाला भारतीय अन्न महामंडळाचे अध्यक्ष अशोक के मीणा यांनी दुजोरा दिला आहे. देशात २०२१-२२ मध्ये १०७७ लाख टन गहू उत्पादन झाले होते. २०२२-२३ मध्ये ३३५.६७ लाख हेक्टरवर गहू लागवड होऊन, सुमारे ११०० लाख टन गहू उत्पादन झाले होते. यंदा २०२३-२४ मध्ये ३३६.९६ लाख हेक्टर क्षेत्रावर गहू लागवड होऊन ११४० लाख टन गहू उत्पादन होण्याचा अंदाज आहे. मध्य प्रदेश, पंजाब आणि उत्तर प्रदेश या प्रमुख गहू उत्पादक राज्यांत उत्पादनात चांगली वाढ होण्याचा अंदाज आहे. केंद्र सरकार भारतीय अन्न महामंडळाच्या माध्यमातून हमीभावाने ३०० ते ३२० लाख टन गहू खरेदी करणार आहे. त्यासाठी देशात २१० खरेदी केंद्र सुरू करण्यात येणार आहेत. ही खरेदी हमीभावाने म्हणजे २२७५ रुपये अधिक त्या-त्या राज्यांनी जाहीर केलेल्या २५ रुपये बोनस, असा २३०० रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी केली जाणार आहे. उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशात गहू काढणी सुरू झाली असून, हमीभावाने खरेदीही सुरू झाली आहे.शक्य यंदाच्या रब्बी हंगामात गहू उत्पादक पट्ट्यात गहू पिकासाठी पोषक असणारी थंडी फेब्रुवारीअखेरपर्यंत राहिली. अवकाळी, गारपिटीचाही फारसा फटका बसला नाही. त्यामुळे गव्हाचे पीक चांगले आहे. मध्य प्रदेश, पंजाब, हरियाणात गहू काढणी सुरू झाली आहे. सरासरीपेक्षा जास्त उत्पादन होण्याचा अंदाज भारतीय किसान संघाचे सरचिटणीस दिनेश कुलकर्णी यांनी व्यक्त केला.गेल्या वर्षी फेब्रुवारी महिन्यापासूनच उत्तर भारताला उष्णतेच्या झळांचा सामना करावा लागला होता. यंदाही हवामान विभागाने उत्तर भारताला उष्णतेच्या झळांचा सामना करावा लागण्याचा अंदाज व्यक्त केला होता. प्रत्यक्षात उत्तरेकडून येणाऱ्या थंड हवेच्या झंझावातामुळे गहू उत्पादक पंजाब, हरियाणा, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये फेब्रुवारीअखेरपर्यंत थंडीचे वातावरण राहिले.

### गहू उत्पादनाचा चढता आलेख

» अवकाळी आणि गारपिटीसारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे पिकाचे नुकसान होण्याचे प्रमाणही कमी राहिले आहे. त्यामुळे यंदाच्या रब्बी हंगामात गव्हाचे उत्पादन ११४० लाख टनांवर जाण्याचा अंदाज केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री अर्जुन मुंडा यांनी व्यक्त केला आहे. या अंदाजाला भारतीय अन्न महामंडळाचे अध्यक्ष अशोक के मीणा यांनी दुजोरा दिला आहे. देशात २०२१-२२ मध्ये १०७७ लाख टन गहू उत्पादन झाले होते. २०२२-२३ मध्ये ३३५.६७ लाख हेक्टरवर गहू लागवड होऊन, सुमारे ११०० लाख टन गहू उत्पादन झाले होते. यंदा २०२३-२४ मध्ये ३३६.९६ लाख हेक्टर क्षेत्रावर गहू लागवड होऊन ११४० लाख टन गहू उत्पादन होण्याचा अंदाज आहे.

# भोरचे आमदार संग्राम थोपटे खासदार सुप्रिया सुळेंबरोबर!

## » लोकसभा निवडणुकीबाबतच्या राजकीय भूमिकेबाबत संभ्रमावस्था

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**शरद पवार यांचे कट्टर विरोधक अशी ओळख असलेले अनंतराव थोपटे यांचे चिरंजीव, आमदार संग्राम थोपटे यांच्यानिवडणुकीबाबतच्या राजकीय भूमिकेबाबत संभ्रमावस्था निर्माण झाली असताना आमदार थोपटे, सुप्रिया सुळे यांच्यासमवेत महाविकास आघाडीच्या रविवारी झालेल्या मेळाव्याला उपस्थित राहिले.**

महाविकास आघाडीबरोबरच असून कायम राहणार असल्याचे थोपटे यांनी स्पष्ट केले.संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिलेल्या बारामती लोकसभा मतदारसंघामध्ये सुप्रिया सुळे विरोधात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा अशी लढत रंगणार आहेत. या निमित्ताने वेगाने राजकीय घडामोडी घडत आहेत. सुनेत्रा पवार यांनी शरद पवार विरोधक अशी ओळख असलेल्या माजी मंत्री अनंतराव थोपटे यांची शनिवारी भेट घेतली होती. तसेच थोपटे यांचे चिरंजीव, आमदार संग्राम हे भाजपमध्ये दाखल होणार असल्याची चर्चाही काही दिवसांपासून सुरू आहे. त्यामुळे महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर भोरमध्ये





रविवारी झालेल्या महाविकास आघाडीच्या मेळाव्याला खासदार सुप्रिया सुळे यांच्यासमवेत संग्राम थोपटे उपस्थित राहिले.थोपटे गेली काही वर्षे भोरचे आमदार आहेत.

बारामती लोकसभा मतदारसंघांतर्गत येत असलेल्या भोर विधानसभा मतदारसंघातील मतदान सुप्रिया सुळे यांच्यासाठी महत्त्वाचे ठरणार आहे. भोर विधानसभेतून त्यांना अपेक्षित मतदान झालेले नाही. त्यातच संग्राम थोपटे भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची चर्चा सातत्याने होत आहे. त्यामुळे संग्राम थोपटे यांच्या राजकीय भूमिकेकडेही लक्ष लागले होते. मात्र मेळाव्याला उपस्थित राहून महाविकास आघाडीबरोबर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.काँग्रेस सोडणार असल्याची चर्चा सातत्याने होत आहे. जिल्ह्यातून आणि जिल्ह्याबाहेहूनही तशी विचारणा करणारे दूरध्वनी सातत्याने येत आहेत.

खासदार सुप्रिया सुळे यांनी काही दिवसांपूर्वी माझ्या कुटुंबियांची भेट घेतली होती. त्यावेळीही माझी राजकीय भूमिका काय, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. मात्र मी महाविकास आघाडीबरोबरच आहे आणि यापुढेही राहीन. यापूर्वीच्या काही निवडणुका काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसने एकत्रित लढल्या होत्या. त्यावेळी आघाडीचा धर्म पाळून मी आघाडीच्या उमेदवाराला विजयी करण्यासाठी ताकद दिली होती.

### कोणत्या गावात भाषण

» आगामी लोकसभा निवडणुकीतही ताकद दिली जाईल. त्यानुसार येत्या शनिवारी (९ मार्च) शरद पवार यांच्या उपस्थितीत मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याचे संग्राम थोपटे यांनी स्पष्ट केले. निवडणूक आल्यावर काही पक्ष मोठे मेळावे घेतात. यातून कोणाची जाहिरात होते, हे पाहिले पाहिजे. महायुतीमध्ये जाहिरात करण्यासाठी सरकारी यंत्रणेचा गैरवापर होत आहे, अशा शब्दात खासदार सुप्रिया सुळे यांनी बारामती येथे झालेल्या 'नमो महारोजगार मेळाव्यावर' टीका केली.त्यामुळे मी कुठे आहे, कोणत्या गावात भाषण करत आहे, हे समाजमाध्यमातून लोकांना समजते. त्यामुळे त्याची माहिती देणे ही माझी नैतिक जबाबदारी आहे, अशा शब्दात त्यांनी त्यांच्या 'सेल्फी' वरून अजित पवार यांनी केलेल्या टीकेला उत्तर दिले.

# मावळात ठाकरेंची तोफ डागणार!

## शिवसेनेचा झंझावती दौरा : संजोग वाघेरेंच्या लढाईची तयारी

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मावळ लोकसभेचा गड काबीज करण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने निर्धार केला आहे. त्याचाच एक भाग म्हणून शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्यांच्या सभांचे आयोजन करण्यात आले आहे. यापुर्वी युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांचा दोन वेळा दौरा झाला आहे. खासदार संजय राऊत यांनी पदाधिकाऱ्यांना भेट दिली आहे. तर उद्या सोमवारी (दि. ५) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले आहे. संजोग वाघेरे यांची लोकसभेसाठी जवळपास उमेदवारी निश्चित झाली असून त्यांच्या पक्षप्रवेशामुळे मतदारसंघात सातत्याने कार्यक्रमांची रेलचेल आहे. त्यामध्ये होणाऱ्या या सभांमुळे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष मावळचा गड राखेल अशी शक्यता निर्माण झाली आहे.**



माजी महापौर संजोग वाघेरे यांच्या पक्षप्रवेशामुळे मावळ लोकसभेत शिवसेनेमध्ये उत्साह निर्माण झाला आहे. निवड झाल्यापासून वाघेरे यांनी संपर्क दौऱ्याला, प्रचाराला देखील सुरूवात केली आहे. पनवेल, उरण आणि कर्जत विधानसभेत त्यांनी प्रचाराला सुरूवात केली आहेच. तर चिंचवड आणि पिंपरी विधानसभा मतदारसंघाची सुरूवात बोपखेल पासून त्यांनी केली आहे. सध्या विविध पदाधिकाऱ्यांची भेट, कार्यकर्त्यांची भेटीगाठी सुरू केल्या आहेत. त्यांच्या साथीला इतरही सहकारी आल्याने या कामाला अधिक प्राप्त झाली आहे. त्यामध्ये वरिष्ठांच्या सभांचे आयोजन केल्याने कार्यकर्त्यांमध्ये चैत्यन्य निर्माण झाले आहे.

युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे यांचा नुकताच ताथवडे येथे पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मेळावा पार पडला. त्यामध्ये त्यांनी विरोधकांवर शरसंधान साधत कार्यकर्त्यांना बळ दिले. या बरोबरच चिंचवड, पिंपरी आणि मावळ विधानसभेची जबाबदारी खासदार संजय राऊत यांच्यावर दिल्याने शिवसेनेची तोफ धडधडणार आहे. यासह पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या ४ मार्च रोजी पनवेल, खोपोली आणि उरण मध्ये सभा आहेत. त्याची पदाधिकाऱ्यांनी जय्यत तयारी केली आहे. यांच्यासह आमदार सचिन अहिर हे चिंचवड, पिंपरी आणि मावळ विधानसभेत तळ ठोकून आहेत. त्यांनी पदाधिकाऱ्यांच्या भेटीवर भर दिला आहे. हे चित्र पाहता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्यासाठी ही निवडणूक सकारात्मक असलं;याची चर्चा आहे.

### महायुतीचा तिढा सुटेना...



एका बाजूला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षाला मावळची जागा सोडून प्रचाराच्या कामालाही सुरूवात झाली आहे. त्यासाठी वाघेरे यांनी मोठा पुढाकार घेतल्याचे दिसत आहे. याऊलट महायुतीमध्ये मात्र अद्याप संभ्रम दिसत आहे. ही जागा भाजपाला सोडायची की मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला या बाबत अद्याप स्पष्टता नाही. हा तिढा कायम असताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने ही या जागेवर आपला दावा केल्याने अधिक तिढा निर्माण झाला आहे. महायुतीच्या या गोंधळाचा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि संजोग वाघेरे यांना होईल अशी चर्चा आहे.

# शरद पवारांची तुतारी... पोहोचली घरोघरी!

## शहरात जोरदार कॅम्पेनिंग: शहराध्यक्ष तुषार कामठेंचा जनसंवाद

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला नुकतेच 'तुतारी वाजवणारा माणूस' हे चिन्ह निवडणूक आयोगाकडून देण्यात आल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्वच पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये जल्लोषाचे व चैतन्याचे वातावरण आहे. त्यातच तुतारी हे मंगल वाद्य मुळातच आपल्या महाराष्ट्राच्या संस्कृतीशी जोडलेले असल्याने सर्वसामान्य नागरिकांपर्यंत ते लवकर पोचत असून बहुतांश नागरिकांकडून चिन्हाला पसंती दर्शवली जात आहे.**



चिन्ह जाहीर झाल्यानंतर पिंपरी चिंचवड मध्ये कार्यकर्त्यांनी मोठ्या जल्लोषात आनंदोत्सव साजरा केला आणि त्यानंतर तुतारी हे चिन्ह व आदरणीय शरदचंद्र पवार साहेब यांचे आजपर्यंतचे उल्लेखनीय कार्य विविध माध्यमांतून पिंपरी चिंचवड शहरातील प्रत्येक नागरीकांपर्यंत पोचविण्यात येत आहे. शहरातील विविध भागांमध्ये होर्डिंग व कियोस्क लावून नागरिकांना आवाहन करण्यात येत असून सोशल मीडियाच्या माध्यमातून सुद्धा तुतारी हे चिन्ह नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचे येत आहे, ज्याला विविध सामाजिक क्षेत्रातील नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. अनेक ज्येष्ठ नागरिक महिला भगिनींकडून शरद पवार साहेबांबद्दल भावनिक व आश्वासक प्रतिक्रियाही दिल्या जात आहेत. येत्या काळात पिंपरी चिंचवड शहरातील मावळ लोकसभा तसेच शिरूर लोकसभा अंतर्गतच्या परिसरात महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मतदारांनी कौल द्यावा यासाठी सर्वच पदाधिकारी एक विचाराने काम करतील असा निर्धार शहर कार्यकारिणी व पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

### सर्वसामान्य नागरिकांचा प्रतिसाद...

निगडी, प्राधिकरण, आकुर्डी, कासारवाडी, दुर्गा टेकडी अशा शहरातील विविध भागांमध्ये शहराध्यक्ष तुषार कामठे, नगरसेविका सुलक्षणा शिलवंत यांच्यासह देवेंद्र तायडे, जयंत शिंदे, विशाल जाधव, मयूर जाधव, अल्ताफ शेख, अरुण थोपटे, गणेश भोंडवे, सागर चिंचवडे, संदेश जगताप, गणेश काळे, वंदना आराख, संगीता खराट, मीनेश काची, अनिल शिंदे, लक्ष्मीकांत गालफाडे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी सर्वसामान्य नागरिकांमध्ये जाऊन थेट संवाद साधत समस्या जाणून घेतल्या. राजकारणात सध्या चाललेल्या नैतिकदृष्ट्या विघातक कृत्यांबद्दल अनेकांनी नाराजी व्यक्त करत शरदचंद्र पवार यांच्या भूमिकांचे समर्थन केले.

# भाजपला इतकी घाई का झाली?




**‘ओल्ड मॅन इन अ हरी’ असा इंग्रजीमध्ये वाक्प्रचार आहे. राजकीय सत्ता हातातून निसटून जाईल याची सतत भीती वा असुरक्षितता वाटणाऱ्या पक्ष वा नेत्याची लगबग या वाक्प्रचारातून व्यक्त होते. भाजपचे सध्याचे वागणे या इंग्रजी वाक्प्रचाराप्रमाणे होऊ लागल्याचे कोणाला वाटू शकते.**

२००४ च्या लोकसभेआधीही भाजपचे असेच वागणे दिसले होते. त्यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कथित गुरू लालकृष्ण अडवाणी यांची भाजपवर सत्ता होती. देशात अटलबिहारी वाजपेयींचे सरकार होते. अडवाणींना कदाचित पंतप्रधान व्हायचे असावे वा केवळ भाजपला पुन्हा सत्ता मिळवून देण्याची महत्त्वाकांक्षा असावी. अडवाणींनी ‘शायनिंग इंडिया’चा शोध लावला होता. देश प्रचंड वेगाने प्रगती करू लागला असून सगळीकडे भारताच्या उज्ज्वल भविष्याचा डंका वाजवला जात आहे, सगळीकडे झगमगाट झाला आहे, अशी अद्भुत कल्पना अडवाणींनी मांडली होती. त्यावेळी भाजपला लोकसभेची निवडणूक जिंकण्याची प्रचंड घाई झाली होती. अडवाणींना ही घाई नडली, सत्ता गेली. त्यानंतर कधीही अडवाणींना पंतप्रधान होता आले नाही. आत्ताही भाजपला तेव्हाइतकीच निवडणूक जिंकण्याची घाई झाली असल्याचे दिसते.खुद्द पंतप्रधान मोदींनी घोषणा केलेली आहे की, ते तिसऱ्यांदा पंतप्रधान होणार आहेत. भाजपला ३७० जागा



आणि ‘एनडीए’ला ४०० पेक्षा जास्त जागा मिळणार आहेत. अडवाणी २००४ मध्ये हरले, मोदी २०२४ मध्ये कदाचित विजयी होतीलही. भाजपचा प्रमुख विरोधक काँग्रेस इतका कमकुवत आहे की, भाजपने काही केले नाही तरी ते विजयी व्हायला हवेत. तरीही भाजप इतका का धावू लागला आहे, हे कोडेच म्हटले पाहिजे. लोकसभेसाठी तयारी करणे हा भाग वेगळा पण, एखादी व्यक्ती आधीपासून पळत सुटली तर तिला हरण्याची भीती तर वाटत नाही, असा उलटा प्रश्न उभा राहू शकतो. अशी घाई विजयाची खात्री नसण्याचे, आत्मविश्वास कमी असल्याचेही लक्षण असू शकते.एका बाजूला पंतप्रधान मोदी म्हणतात की, कमळ हाच भाजपचा उमेदवार असेल. असे असेल तर भाजपने उभ्या केलेल्या उमेदवारांच्या स्व-सामर्थ्याला काहीच किंमत नाही असा अर्थ निघू शकतो. मग, ऐनवेळेला भाजप दुसऱ्या पक्षातून उमेदवार कशासाठी आयात करू लागला आहे? महाराष्ट्रातून अशोक चव्हाण, बसवराज पाटील अशा नेत्यांना कशाला घेतले? ज्या कृपाशंकर सिंह यांच्याविरोधात भाजपने एकेकाळी रान उठवले होते, त्यांना उत्तर प्रदेशातून उमेदवारी देण्याची वेळ भाजपवर का ओढवली आहे? मोदींवर भ्रष्टाचाराचा एकही आरोप झालेला नाही, ते स्वच्छ राजकारणी असतील. पण, ते भ्रष्ट उमेदवारांच्या जिवावर ४०० चा आकडा पार करू पाहात आहेत, असा मुद्दा पारंपरिक भाजप व संघविचारांचे प्रामाणिक कार्यकर्ते हवे असेल तर उपस्थित करूही शकतील.उत्तर प्रदेशात ‘बसप’चे रितेश पांडे भाजपमध्ये आले आणि आंबेडकरनगरमधून त्यांना उमेदवारीही मिळाली. इतकी वर्षे तिथे कार्यरत राहणारे भाजपचे कार्यकर्ते कुमकामी होते का? समजा ते असतील तरीही कमळावरच निवडणूक लढवली जाणार असेल तर रितेश पांडेंची भाजपला गरज का भासली? भाजप राज्या-राज्यांतून उमेदवार आयात करू लागला आहे. मध्य प्रदेशमध्ये कमलनाथ अजून हाताला लागलेले नाहीत. तसा प्रयत्न पुन्हा होणारच नाही असे नव्हे. हिमाचल प्रदेशामध्ये मासे गळाला लागले तर हवेच आहेत. लोकसभा निवडणुकीच्या आधी भाजप उसने लोक उधारीवर का घेऊ लागला आहे, असा प्रश्न खरोखर कोणी विचारला तर भाजपचे त्यासंदर्भातील स्पष्टीकरण महत्त्वाचे ठरेल.केंद्रीय निवडणूक आयोगाने अजून लोकसभा निवडणुकीच्या तारखांची घोषणाही केलेली नाही, तरीही भाजपने १९५ उमेदवारांची यादी जाहीर करून टाकली. भाजपच्या या कृतीतून लोकसभा निवडणुकीसाठी वातावरण निर्मिती झाली हे मान्य करावे लागेल. भाजपने निवडणुकीच्या तयारीत तरी आगेकूच केलेली आहे. काँग्रेसने अद्याप उमेदवारांची चर्चाही केलेली नाही. ‘इंडिया’ आघाडीतील घटक पक्षांमध्ये जागावाटपाचा तिढा सुटलेला नाही. आम्ही तर उमेदवारही घोषित केले अशा वाकुल्या भाजप विरोधकांना दाखवू शकेल. कदाचित उमेदवारांना आधीपासून कामाला सुरुवात करता यावी, लोकसंपर्क वाढवता यावा, केंद्राच्या योजना अधिकाधिक मतदारांपर्यंत पोहोचवता याव्यात असा व्यापक उद्देश असावा.

## संपादकीय »

# उपभोगशून्य वाढ!

***सद्या:स्थितीत अर्थव्यवस्थेचा गाडा ओढण्याची जबाबदारी प्रामुख्याने सरकारनेच घेतलेली आणि खासगी क्षेत्राचा हात आखडता, असे चित्र दिसते...***

देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात (ग्रॉस डोमेस्टिक प्रॉडक्ट- जीडीपी) आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीत ८.४ टक्के इतकी वाढ नोंदली गेली ही आनंदवार्ताच. ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर या तिमाहीचा हा तपशील नुकताच जाहीर झाला. या तिमाहीच्या उत्तम कामगिरीची ही आनंदवार्ता निवडणुकांच्या तारखा घोषित होण्याआधी प्रसृत झाली याचा ‘अर्थाअर्थी’ काही संबंध आहे असा संशय घेण्याचे काही कारण नाही. तसेच अधोगतीप्रमाणे प्रगतीचा अंदाज बांधण्यातही आपली रिझर्व्ह बँक अपयशी ठरली याबाबतही छिद्रान्वेषी दृष्टिकोनातून विचार करणे योग्य नाही. रिझर्व्ह बँकेच्या मते या तिमाहीत अर्थगती ६.५ टक्के असणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात ही वाढ ८.४ टक्के इतकी नोंदली गेली. म्हणजे साधारण दोन टक्क्यांनी आपल्याच रिझर्व्ह बँकेचा आपल्याच अर्थगतीबाबतचा कयास चुकला. ही काही टिंगल करावी अशी बाब नाही.

मराठा समाजाला आरक्षण तसेच राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना सुधारित निवृत्तिवेतन योजना लागू करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने दोन महत्त्वाचे प्रश्न मार्गी लावले आहेत. जुनी निवृत्तिवेतन योजना पुन्हा लागू करावी यासाठी सरकारी कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी आंदोलन संप पुकारला होता.

# सुधारित निवृत्तिवेतनातून मतांच्या निर्वाहाकडे..

कर्मचाऱ्यांमधील नाराजी आगामी लोकसभा तसेच त्यापाठोपाठ होणाऱ्या विधानसभा निवडणुकांना बाधक ठरू नये या उद्देशाने हा निर्णय झाल्याचे स्पष्टच दिसते. निवृत्तिवेतन योजनेवरूनच सरकारी कर्मचारी विरोधात गेल्याने हिमाचल प्रदेशात भाजपला सत्ता गमवावी लागली. राज्यातही नागपूर शिक्षक, अमरावती व मराठवाडा पदवीधर या मतदारसंघांमध्ये सत्ताधारी भाजपला पराभव स्वीकारावा लागला. जुनी निवृत्तिवेतन योजना लागू केल्यास राज्य दिवाळखोरीत जाईल, असा स्पष्ट दावा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस करत होते. पण त्याचे राजकीय परिणाम विशेषत: नागपूरमध्ये भोगावे लागल्यावर फडणवीस यांचीही भूमिका बदलली होती. जुनी नव्हे, पण सुधारित निवृत्तिवेतन योजना लागू केल्याबद्दल विविध सरकारी कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी स्वागत केले हे महत्त्वाचे. महाराष्ट्र सरकारने आंध्र प्रदेशच्या धर्तीवर सुधारित निवृत्तिवेतन योजना लागू केली आहे. महाराष्ट्रात २००५ पासून नवीन




निवृत्तिवेतन योजना लागू करण्यात आली. १ नोव्हेंबर २००५ किंवा त्यानंतर राज्य सरकारी सेवेत दाखल झालेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सुधारित निवृत्तिवेतन योजनेचा लाभ मिळेल.नवीन निवृत्तिवेतन योजना ही बाजाराशी संलग्न असल्याने बाजारातील चढ-उतारावर या योजनेत मिळणारे निवृत्तिवेतन अवलंबून असते. म्हणजेच निश्चित किंवा ठोस अशी रक्कम मिळत नाही. बाजारात तेजी असल्यास अधिकचा फायदा पण बाजार कोसळल्यास पुढील महिन्यात निवृत्तिवेतनाची रक्कम घटू शकते. यालाच नेमका सरकारी कर्मचाऱ्यांचा विरोध आहे. जुन्या निवृत्तिवेतन योजनेत शेवटच्या मूळ वेतनाच्या (बेसिक) ५० टक्के रक्कम ही निवृत्तिवेतन म्हणून मिळते, तर निवृत्तिवेतनाचा सारा वाटा हा सरकारकडून जमा केला जातो. हा खर्च कमी करण्याकरिता वाजपेयी सरकारच्या काळात बाजाराशी संलग्न अशी नवीन निवृत्तिवेतन योजना लागू करण्यात आली होती. आता ‘सुधारित निवृत्तिवेतन योजने’त कर्मचाऱ्यांना शेवटच्या मूळ वेतनाच्या ५० टक्के निवृत्तिवेतन अधिक महागाईभत्ता असे फायदे मिळणार आहेत. अखेरच्या वेतनाच्या ५० टक्के निवृत्तिवेतनाची हमी सरकारने दिली असली तरी कर्मचाऱ्यांना दरमहा १० टक्के वाटा जमा करण्याचे बंधन कायम असेल.सरकार १४ टक्के वाटा देणार. निवृत्तीनंतर शेवटच्या वेतनाच्या ५० टक्के रक्कम हातात येईल. बाजारातील जोखमीची जबाबदारी ही राज्य सरकारने घेतली आहे. बाजार कोसळल्यास होणारा तोटा हा सरकारकडून वळता केला जाईल. राज्यात नवीन निवृत्तिवेतन योजना प्रणाली लागू असलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची संख्या ८ लाख २७ हजार आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# 400 जागा कसे जिंकतात तेच पाहतो!

## अबकी बार भाजपा करूया तडीपार : उद्धव ठाकरे

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी लोकसभा निवडणुकीची कोणत्याही क्षणी घोषणा होऊ शकते. ही निवडणूक लक्षात घेता महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींना वेग आलाय. सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करतायत. उद्धव ठाकरे यांनीदेखील एका जाहीर सभेला संबोधित करताना भाजपावर सडकून टीका केली. भाजपा आणि आमचं हिंदुत्व वेगळं आहे. भाजपा ४०० जागा कशी जिंकते तेच मी पाहतो, असं उद्धव ठाकरे म्हणाले.**




"याआधीच्या लोकसभा निवडणुकीत भाजपा आणि शिवसेनेच्या युतीने ४२ खासदार निवडून दिले नसते, तर भाजपाला दिल्लीचं तख्त राखता आलं नसतं. आता दिल्लीचं तख्त पहिल्यांदा फोडावं लागेल आणि तिथे आपलं तख्त बसवावं लागेल. अबकी बार ते ४०० पार असं सांगतायत. मी तर म्हणतो की अबकी बार भाजपा तडीपार करुया. तुम्ही ४०० पेक्षा अधिक जागा कसे जिंकतात तेच मी पाहतो," असं आव्हान उद्धव ठाकरेंनी भाजपाला दिलं.भाजपाने आमचा विश्वासघात केला, असा आरोपही उद्धव ठाकरेंनी भाजपावर केला. "अरे गेल्या वेळेला महाराष्ट्राने ४० ते ४२ खासदार निवडून दिले नसते तर भाजपाला २५० पेक्षा अधिक जागा जिंकता आल्या नसत्या. भाजपाने दोन वेळा आमचा विश्वासघात केला," असं ठाकरे म्हणाले."आम्हाला भाजपाचं हिंदुत्व मान्य नाही. आमचं हिंदुत्व वेगळं आहे, असंही उद्धव ठाकरेंनी स्पष्टपणे सांगितलं. "आम्ही हिंदुत्त्वाच्या मुद्द्यावर भाजपासोबत होतो. मात्र भाजपाचं आणि आमचं हिंदुत्त्व खूप वेगळं आहे. मला भाजपाचं हिंदुत्त्व मान्य नाही. आज समाजवादी विचारांचे सगळे लोक माझ्यासोबत आले आहेत. मुस्लीम लोकही आज माझ्यासोबत आहेत. कारण आमचं हिंदुत्त्व हे घरातली चूल पेटवणारं आहे. भाजपाचं हिंदुत्त्व हे घर पटेवणारं आहे. आमचं हिंदुत्त्व हे संत गाडगेबाबा यांचं हिंदुत्त्व आहे. जो तहाणलेला असेल त्याला पाणी देणं, जो भुकेला असेल त्याला अन्न देणं, ज्याला घर नाही त्याला घर देणं हे आमचं हिंदुत्त्व आहे," असं ठाकरेंनी स्पष्टपणे सांगितलं. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य तसेच देशातील राजकीय घडामोडींना वेग आलाय. सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर टोकाचे आरोप-प्रत्यारोप करतायत. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज (३ मार्च) एका सभेला संबोधित केलं. यावेळी त्यांनी देशासह राज्यात सत्ताधारी भाजपाविरोधात असंतोष आहे. भाजपाने यावेळी ईव्हीएममध्ये घोटाळा करून दाखवावाच. तसं केलं तर देशात असंतोषाची लाट येईल. देशातील हुकूमशाहीविरोधात आम्ही एकत्र आलो आहोत, असं ठाकरे म्हणाले. यावेळी बोलताना त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरही टीका केली."आज शेतकरी, कामगार, विद्यार्थी आक्रोश करत आहेत. पण ईव्हीएममध्ये काय होणार? अशी भीती सर्वांनाच आहे. लोकांमध्ये सरकारविरोधात उघड रोष दिसतो. या वेळेला त्यांनी ईव्हीएममध्ये घोटाळा करण्याचा प्रयत्न केला तर असंतोषाचा भडका उडाल्याशिवाय राहणार नाही. तुम्ही ईव्हीएम घोटाळा करूनच बघा," असं आव्हान ठाकरेंनी भाजपाला दिलं."देशभर लोकांमध्ये आक्रोश आहे. मी लोकांमध्ये, शेतकऱ्यांमध्ये जातो. पण ग्रामीण भागात माझ्या सभांना सगळे शेतकरीच असतात. मी या शेतकऱ्यांना प्रश्न विचारतो की मी मुख्यमंत्री असताना केलेली कर्जमुक्ती तुम्हाला मिळाली होती की नाही? हो कर्जमुक्ती मिळाली होती, असं सगळे ओरडून सागंतात. आता मात्र दुष्काळात तेरावा महिना म्हणून हे घटनाबाह्य सरकार आलं आहे. कर्जमाफी सोडून द्या, महाराष्ट्रावर पुन्हा कर्जाचा डोंगर उभा राहिला आहे," असा दावा उद्धव ठाकरेंनी केला.

भाजपाकडे मोदींशिवाय पर्याय आहे का. आम्ही सगळे मोदींविरोधात नव्हे तर हुकूमशाहीविरोधात एकत्र आलो आहोत. आम्हाला या देशात हुकूमशाहा नको आहे. हुकूमशाहीला एकच पर्याय असतो तो म्हणजे लोकशाही. आम्हाला देशातली लोकशाही टिकवायची आहे.

### अल्लाहुद्दीनचा जादूचा दिवा...

"मला आश्चर्य वाटतं की काही सुशिक्षित लोक विचारतात की विरोधकांकडे पर्याय कोण आहे. मी त्यांना म्हणतो की हा प्रश्न तुम्ही भाजपाला विचारा. भाजपाकडे पर्याय कोण आहे. एकच प्रोडक्ट किती वेळा लॉन्च करणार. तेच प्रोडक्ट किती वेळा घासणार. कारण याआधीच्या दोन निवडणुकांत भाजपाचं तेच प्रोडक्ट होतं. हे प्रोडक्ट म्हणजे अल्लाहुद्दीनचा जादूचा दिवा आहे आणि तो दिवा घासला की स्वप्न साकार होईल, असं भाजपाला वाटतं. पण या दिव्यातून थांपाशिवाय दुसरं काही बाहेरच पडत नाही," अशी बोचरी टीका उद्धव ठाकरेंनी केली.

# जरांगेची नाटकं महाराष्ट्राला कळली आहेत!

## एका क्षणी हॉस्पिटलमध्ये असतो मग तो तिकडे आंतरवलीला जातो

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा आंदोलक मनोज जरांगे हे नाव गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आलं आहे. याची दोन कारणं आहेत. पहिलं कारण म्हणजे मराठा समाजाला आरक्षण मिळालं पाहिजे म्हणून त्यांनी सुरु केलेला लढा. तर दुसरं कारण आत्ताचंच आहे.**



मागच्या रविवारी त्यांनी थेट देवेंद्र फडणवीस यांनाच लक्ष्य केलं. देवेंद्र फडणवीस यांच्यावर त्यांनी खालच्या पातळीवर टीका केली. त्याआधी त्यांनी आपल्या भाषणांमधून छगन भुजबळांवर टीका केली होती. आता छगन भुजबळ यांनी मनोज जरांगेंचं नाटक सगळ्या महाराष्ट्राला लक्षात आल्याचं म्हटलं आहे.मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या संवाद दौऱ्यास आजपासून सुरुवात झाली आहे. अंतरवाली सराटी येथून निघाल्यानंतर जरांगे पाटील बीड जिल्ह्यातील वानगाव या ठिकाणी दाखल झाले. यावेळी मराठा समाज बांधवांना जरांगे यांनी मार्गदर्शन केले. दरम्यान राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाटील यांनी पुन्हा एकदा इशारा दिला आहे. "देवेंद्र फडणवीस पोलिसांचे कान फुंकत आहेत. माझ्याविरोधात एसआयटी चौकशी लावली आहे. पण मी इंचभरही मागे हटणार नाही. मी चौकशीसाठी तयार आहे. देवेंद्र फडणवीस यांनी मला आत टाकून दाखवावेच, त्यानंतर भावनिक लाट काय असते? हे त्यांना दिसेल. तुमचा सगळा सुपडा साफ होईल", असे आव्हानच मनोज जरांगे यांनी फडणवीस यांना दिले.मनोज जरांगे पुढे म्हणाले, माननीय न्यायालयाने आम्हाला शांततेत रास्ता रोको करण्याचे निर्देश दिले होते.

### 13 मार्चला पुढील तारीख

तरीही आमच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले. आम्ही काहीही करणार नव्हतो. माझ्या उपोषणाचा १५ वा दिवस असताना २२ फेब्रुवारी रोजी न्यायालयाने १३ मार्चला पुढील तारीख दिली होती. पण एका रात्रीत गृहमंत्र्यांनी तारीख बदलून २३ फेब्रुवारी करून घेतली. त्यानंतर एका गुप्त बैठकीत ठराव झाला.

# भाजपने शिवीगाळ, चिथावणीखोर विधानं करणाऱ्यांना भाजपाने उमेदवारी नाकारली

## पहिल्या यादीत अनेक बदल केल्यामुळे ही यादी चांगलीच चर्चेत

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**लोकसभा निवडणुकीसाठी अवघे काही दिवस उरले असताना भाजपाने १६ राज्यातून १९५ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. पहिल्या यादीत अनेक बदल केल्यामुळे ही यादी चांगलीच चर्चेत आहे. पश्चिम बंगालच्या आसनसोल मतदारसंघात शत्रुघ्न सिन्हा यांच्याविरोधात भोजपुरी गायक पवन सिंह यांना उमेदवारी दिली गेली, मात्र त्यांनी आज अचानक माघार घेतली. तर दिल्लीच्या चांदणी चौक येथून माजी मंत्री डॉ. हर्षवर्धन यांचे तिकीट कापल्यानंतर त्यांनी आज थेट राजकारणातून निवृत्ती घेतली. फक्त डॉ. हर्षवर्धनच नाही तर इतरही अनेक नेत्यांना भाजपने तिकीट नाकारले आहे. यामध्ये त्या खासदारांचाही समावेश आहे, ज्यांनी आपल्या कार्यकाळात भडकाऊ, चिथावणीखोर विधानं करून भाजपाला अडचणीत आणले होते.**



भाजपने पहिल्या यादीत काही प्रमुख खासदार जसे की, प्रज्ञा सिंह ठाकूर, रमेश बिधुरी आणि प्रवेश वर्मा यांना तिकीट नाकारले आहे. तसेच जयंत सिन्हा आणि क्रिकेटपटू गौतम गंभीर यांनाही उमेदवारी दिलेली नाही. मात्र जयंत सिन्हा आणि गौतम गंभीर यांनी यादी जाहीर होण्यापूर्वीच निवडणुकीतून माघार घेतली होती. प्रज्ञा सिंह, रमेश बिधुरी आणि परवेश वर्मा यांनी आपल्या कार्यकाळात संसदेत आणि संसदेबाहेर अनेकदा अनेकदा वादग्रस्त विधाने केली होती. भाजपाने यांना तिकीट नाकारून निवडणुकीच्या काळात जोखीम न उलण्याचे धोरण स्वीकारल्याचे दिसते.प्रज्ञा सिंह ठाकूर या २००८ च्या मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणी आरोपी होत्या.

आरोपातून मुक्त झाल्यानंतर भाजपाने त्यांना निवडणुकीतून उतरवले होते, तेव्हाही भाजपावर जोरदार टीका झाली होती. गेल्या काही काळात त्यांच्या चिथावणीखोर विधानामुळे भाजपावर विरोधकांनी टीका केली होती. ठाकूर यांनी महात्मा गांधींवर गोळ्या झाडणाऱ्या नथुराम गोडसेला देशभक्त असल्याचे म्हटले होते. या विधानावर विरोधकांसह मित्रपक्षांनीही आक्षेप घेतला होता. माजी मुख्यमंत्री स्व. साहिब सिंह वर्मा यांचे सुपुत्र आणि दोन वेळा खासदार राहिलेल्या परवेश सिंह वर्मा यांचे तिकीट कापल्यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे. परवेश सिंह यांनीही अनेकदा वादग्रस्त विधानामुळे पक्षाला अडचणीत आणले होते. २०२० साली दिल्लीच्या शाहीन बाग येथे अल्पसंख्याक महिलांचे आंदोलन सुरू असताना परवेश सिंह वर्मा यांनी वादग्रस्त विधान केले होते. दिल्ली विधानसभेत भाजपाची सत्ता आल्यास आंदोलकांना एका तासात आंदोलनस्थळावरून हाकलून लावू, असे विधान त्यांनी केले होते. दक्षिण दिल्लीचे खासदार रमेश बिधुरी यांचेही तिकीट कापण्यात आले आहे. नव्या संसद भवनात मागच्या वर्षी सप्टेंबर महिन्यात विशेष अधिवेशन घेण्यात आले होते. या अधिवेशनात रमेश बिधुरी यांनी बसपाचे तेव्हाचे खासदार दानिश अली यांना उद्देशून जातीवाचक शिवीगाळ केली होती. ही शिवीगाळ संसदेच्या थेट प्रक्षेपणातही ऐकू आली होती. सभागृहात उपस्थित असलेले संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी प्रसंगाचे गांभीर्य पाहून मध्यस्थी करत स्वतः माफी मागून या वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला होता. प्रज्ञा सिंह ठाकूर, रमेश बिधुरी आणि प्रवेश वर्मा यांना तिकीट नाकारले आहे. तसेच जयंत सिन्हा आणि क्रिकेटपटू गौतम गंभीर यांनाही उमेदवारी दिलेली नाही. मात्र जयंत सिन्हा आणि गौतम गंभीर यांनी यादी जाहीर होण्यापूर्वीच निवडणुकीतून माघार घेतली होती.

### पक्षाला अडचणीत आणले होते

प्रज्ञा सिंह, रमेश बिधुरी आणि परवेश वर्मा यांनी आपल्या कार्यकाळात संसदेत आणि संसदेबाहेर अनेकदा अनेकदा वादग्रस्त विधाने केली होती. भाजपाने यांना तिकीट नाकारून निवडणुकीच्या काळात जोखीम न उलण्याचे धोरण स्वीकारल्याचे दिसते.प्रज्ञा सिंह ठाकूर या २००८ च्या मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणी आरोपी होत्या. आरोपातून मुक्त झाल्यानंतर भाजपाने त्यांना निवडणुकीतून उतरवले होते, तेव्हाही भाजपावर जोरदार टीका झाली होती. गेल्या काही काळात त्यांच्या चिथावणीखोर विधानामुळे भाजपावर विरोधकांनी टीका केली होती. ठाकूर यांनी महात्मा गांधींवर गोळ्या झाडणाऱ्या नथुराम गोडसेला देशभक्त असल्याचे म्हटले होते. माजी मुख्यमंत्री स्व. साहिब सिंह वर्मा यांचे सुपुत्र आणि दोन वेळा खासदार राहिलेल्या परवेश सिंह वर्मा यांचे तिकीट कापल्यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे. परवेश सिंह यांनीही अनेकदा वादग्रस्त विधानामुळे पक्षाला अडचणीत आणले होते. २०२० साली दिल्लीच्या शाहीन बाग येथे अल्पसंख्याक महिलांचे आंदोलन सुरू असताना परवेश सिंह वर्मा यांनी वादग्रस्त विधान केले.

# आरोग्य मंत्री डॉ. हर्षवर्धन यांचा राजकारणालाच राम-राम

## डॉ. हर्षवर्धन यांचे तिकीट कापल्यानंतर थेट राजकारणातून निवृत्ती

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**दिल्लीमधील चांदणी चौकचे खासदार आणि भाजपाचे वरिष्ठ नेते डॉ. हर्षवर्धन यांनी राजकारणाला राम राम ठोकून निवृत्ती जाहीर केली आहे. आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भाजपने त्यांचे तिकीट कापल्यानंतर त्यांनी हा निर्णय जाहीर केला. शनिवारी भाजपाने दिल्लीतील पाच लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवारांच्या नावांची घोषणा केली.**

यामध्ये चांदणी चौक येथून प्रवीण खंडेलवाल यांना तिकीट देण्यात आले आहे.डॉ. हर्षवर्धन हे याच मतदारसंघातून पाच वेळा आमदार आणि दोन वेळा खासदार राहिले आहेत. त्यांनी केंद्रीय आरोग्य आणि पर्यावरण मंत्री म्हणून काम केले होते.

आपल्या एक्स अकाऊंवर भली मोठी पोस्ट लिहून डॉ. हर्षवर्धन यांनी या निर्णयाची माहिती दिली. तसेच राजकारणातून बाजूला झाल्यानंतर पूर्व दिल्लीच्या कृष्णा नगर भागात असलेल्या आपल्या दवाखान्यावर लक्ष देणार असून कान-नाक-घसा तज्ज्ञ म्हणून वैद्यकीय सेवा देण्याचे काम करणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले.



डॉ. हर्षवर्धन यांनी आपल्या दीर्घ पोस्टमध्ये लिहिले की, तीस वर्ष माझी अतिशय सुरेख अशी राजकीय कारकिर्द राहिली. पाच वेळा विधानसभा आणि दोन वेळा लोकसभा निवडणुकीत मला मोठ्या फरकाने लोकांनी जिंकून दिलं. या काळात पक्षात आणि सरकारमध्ये महत्त्वाची पदे भूषविण्याची संधी मला मिळाली. आता मी यातून बाहेर पडत असून पुन्हा एकदा माझ्या मूळ कामाला मी जात आहे. डॉ. हर्षवर्धन पुढे लिहितात,वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएसचे शिक्षण घेतल्यानंतर पहिल्या दिवसापासून मी गरिबांना आणि गरजूंना मदत करणे, हेच माझे ध्येय ठेवले.

### मी शेवटपर्यंत संघ कार्यकर्ता

तत्कालीन राष्ट्रीय स्वंयसेवक संघातील नेतृत्वाच्या आग्रहामुळे मी राजकारणात प्रवेश केला होता."मी एक स्वंयसेवक आहे. शेवटच्या माणसापर्यंत सेवा पोहोचली पाहीजे, या पंडित दिनदयाल उपाध्याय यांच्या अंतोदय तत्त्वज्ञानाने भारावून जात आजवर मी कार्यरत राहिलो. तेव्हाच्या आरएसएसच्या नेत्यांनी मला राजकारणात येण्याची समजूत घातली, म्हणून मी निवडणुकीला उभा राहिलो. राजकारण म्हणजे आपल्या तीन प्रमुख शत्रूंशी लढण्याचे एक साधन आहे, अशी माझी समजूत घालण्यात तेव्हा ते नेते यशस्वी ठरले. गरीबी, रोग आणि अज्ञान हे मानवाचे तीन प्रमुख शत्रू आहेत, असे मी मानतो", अशी भावना डॉ. हर्षवर्धन यांनी आपल्या पोस्टमध्ये व्यक्त केली.


# धर्मेंद्र यांच्या नव्या पोस्टने चाहते चिंतेत!



बॉलीवूडमधील ज्येष्ठ अभिनेते म्हणून धर्मेंद्र यांना ओळखले जाते. ७० च्या दशकात त्यांनी अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केले. आतापर्यंत त्यांनी तब्बल ३०० चित्रपटांमध्ये वेगवेगळ्या धाटणीच्या भूमिका साकारल्या आहेत. वयाच्या ८८ व्या वर्षातही ते चित्रपटसृष्टीत कार्यरत आहेत. सोशल मीडियावर धर्मेंद्र मोठ्या प्रमाणात सक्रिय असतात. निरनिराळे फोटो व व्हिडीओ शेअर करत ते चाहत्यांना अपडेट देत असतात. दरम्यान, त्यांच्या नव्या पोस्टने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे.धर्मेंद्र यांनी त्यांच्या ट्विटर एक्सवर एक पोस्ट शेअर केली आहे. पोस्टमध्ये त्यांनी त्यांच्या एका जुन्या चित्रपटातील सीनचा फोटो पोस्ट केला आहे. या फोटोबरोबरच त्याला दिलेल्या कॅप्शनने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. फोटोबरोबर त्यांनी लिहिले, 'अच्छा तो हम चलते हैं।', धर्मेंद्र यांची ही पोस्ट सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली आहे. अभिनेत्याची ही पोस्ट बघून चाहते चिंतेत पडले आहेत. या पोस्टवर अनेकांनी कमेंटही केली आहे. एकाने लिहिले, "धरमजी, तुम्हाला वाटते का की आम्ही तुम्हाला कुठेही जाऊ देऊ, आम्ही तुम्हाला कुठेही जाऊ देणार नाही." तर अनेकांनी त्यांच्या पोस्टवर कमेंट करत चिंताही व्यक्त केली आहे.काही दिवसांपूर्वीच धर्मेंद्र यांनी सोशल मीडियावर त्यांचा एक फोटो शेअर केला होता. फोटोमध्ये त्यांच्या हातात जेवणाचे ताट होते. चेहरा सुकलेला व त्यांच्या पायाला फॅक्चर असल्याचेही दिसून आले होते. हा फोटो शेअर करत त्यांनी लिहिले होते, "आर्धी रात्र झालीयं, झोप येत नाहीय, भूक लागली आहे.

# सुहाना अन् बिग बींच्या नातीसह शाहरुखचा डान्स

अनंत अंबानी आणि राधिका मर्चंट यांच्या प्री-वेडिंग सोहळ्याला १ मार्चपासून जामनगरमध्ये सुरुवात झाली आहे. या कार्यक्रमाला मनोरंजन विश्वापासून ते राजकीय, क्रिकेट अशा सगळ्या क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावली आहे. अंबानी कुटुंबीयांनी उपस्थित पाहुण्यांसाठी जामनगरमध्ये जय्यत तयारी केल्याचं पाहायला मिळत आहे.प्री-वेडिंगच्या पहिल्याच दिवशी ( १ मार्च ) हॉलीवूड गायिका रिहानाने जबरदस्त परफॉर्मन्स दिला होता. यानंतर दुसऱ्या दिवशी बॉलीवूड सेलिब्रिटी व्यासपीठावर एकत्र थिरकताना पाहायला मिळाले. रणवीर-दीपिका, शाहरुख-सलमान व आमिर, रणबीर-आलिया, जान्हवी-सारा, करीना व करिश्मा कपूर या सगळ्या सेलिब्रिटींनी मोठ्या उत्साहात या प्री-वेडिंग सोहळ्यात परफॉर्म केलं. या सगळ्यांचे व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. अशातच एका खास व्हिडीओने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे.शाहरुख आणि सुहाना खान यांनी प्री-वेडिंग कार्यक्रमात एकत्र डान्स केल्याचा व्हिडीओ इन्स्टंट बॉलीवूड या पापाराझी पेजवरून शेअर करण्यात आला आहे. यावेळी सुहानाबरोबर बिग बींची नात नव्या नवेली नंदा, अनन्या पांडे, शनाया कपूर या देखील उपस्थित होत्या. हे सगळेजण मिळून दिलजीत दोसांझच्या लव्हर गाण्यावर थिरकले. प्री-वेडिंग कार्यक्रमात दिलजीतने लाइव्ह परफॉर्म केलं होतं.दरम्यान, अनंत-राधिकाच्या प्री-वेडिंग कार्यक्रमाचा आज ( ३ मार्च ) शेवटचा दिवस आहे. येत्या जुलै महिन्यात हे दोघंही लग्नबंधनात अडकणार आहेत.अनंत अंबानी आणि राधिका मर्चंट यांच्या प्री-वेडिंग सोहळ्याला १ मार्चपासून जामनगरमध्ये सुरुवात झाली आहे. या कार्यक्रमाला मनोरंजन विश्वापासून ते राजकीय, क्रिकेट अशा सगळ्या क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावली आहे. अंबानी कुटुंबीयांनी उपस्थित पाहुण्यांसाठी जामनगरमध्ये जय्यत तयारी केल्याचं पाहायला मिळत आहे.प्री-वेडिंगच्या पहिल्याच दिवशी ( १ मार्च ) हॉलीवूड गायिका रिहानाने जबरदस्त परफॉर्मन्स दिला होता. यानंतर दुसऱ्या दिवशी बॉलीवूड सेलिब्रिटी व्यासपीठावर एकत्र थिरकताना पाहायला मिळाले.



# आलिया भट्टचा भन्नाट डान्स

देशाचे सर्वात मोठे उद्योगपती मुकेश अंबानींचा छोटा मुलगा अनंत अंबानी यांचा प्री-वेडिंग कार्यक्रम मोठ्या धुमधडाक्यात गुजरातमधील जामनगर येथे सुरू आहे. हॉलीवूडपासून बॉलीवूडपर्यंतचे कलाकार मंडळी या कार्यक्रमाला उपस्थित आहेत. १ मार्चपासून सुरू झालेल्या या प्री-वेडिंग कार्यक्रमाचा आज शेवटचा दिवस आहे. काल, दुसऱ्या दिवशी संगीत सोहळा पार पडला. ज्यामध्ये बॉलीवूडच्या सेलिब्रिटींचा जबरदस्त डान्स पाहायला मिळाला. बऱ्याच काळानंतर तीन खान एकत्र परफॉर्मन्स करताना दिसले. सध्या याचे व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होतं आहेत.अनंत-राधिका यांच्या संगीत सोहळ्यात रणबीर कपूर-आलिया भट्टने आकाश अंबानी-श्लोका मेहतासह भन्नाट डान्स केला. याचे व्हिडीओ रणबीर, आलियाच्या फॅन पेजवर शेअर करण्यात आले आहेत. ज्यामध्ये बॉलीवूडच्या क्यूट कपलसह आकाश अंबानी-श्लोका मेहता 'ब्रम्हास्त्र' चित्रपटातील सुपरहिट गाणं 'केसरिया'वर डान्स करताना दिसत आ हे त . याचे व्हिडीओ सध्या चांगलाच चर्चेत आले आहेत.दरम्यान, अनंत-राधिका यांच्या प्री-वेडिंग कार्यक्रमाला शाहरुख खान, आमिर खान, सलमान खान, करिना कपूर, सैफी अली खान, जान्हवी कपूर, शिखर पहाडिया, सोनम कपूर, आनंद आहुजा, रितेश देशमुख, जिनिलीया देशमुख, अर्जुन कपूर, सुहाना खान, नव्या नवेली नंदा, टायगर श्रॉफ, करिश्मा कपूर, राणी मुखर्जी, सोनाली बेंद्रे, नताशा पूनावालासह बॉलीवूडचे सेलिब्रिटी उपस्थित आहेत.

# बच्चन कुटुंब गायब

गुजरातमधील जामनगर इथं अनंत अंबानींचा प्री-वेडिंग सोहळा पार पडतोय. तीन दिवसाच्या सोहळ्याचा आज शेवटचा दिवस आहे. पहिल्या दिवशी रिहानाने परफॉर्म करत जगभरातून आलेल्या पाहुण्यांचं मनोरंजन केलं, तर दुसऱ्या दिवशी बॉलीवूडकरांनी या कार्यक्रमाची शोभा वाढवली. पण दोन्ही दिवस सिनेसृष्टीतील आघाडीचे बच्चन कुटुंब या कार्यक्रमात दिसले नाही. आता त्यांचा एक व्हिडीओ समोर आला आहे.अमिताभ बच्चन व त्यांचे कुटुंबीय आज तिसऱ्या व अखेरच्या दिवशी अनंत अंबानी व राधिका मर्चंट यांच्या प्री-वेडिंग सोहळ्याला हजेरी लावतील. यासाठी अमिताभ बच्चन, त्यांच्या पत्नी जया बच्चन, त्यांची मुलगी श्वेता बच्चन व नातू अगस्त्य नंदा हे एअरपोर्टवर पोहोचले. तर दुसऱ्या कारमध्ये अभिषेक, त्याची पत्नी ऐश्वर्या आणि मुलगी आराध्या पोहोचल्याचं पाहायला मिळालं. बच्चन कुटुंबीय एकत्र जामनगरला गेले.

# प्री-वेडिंग सोहळ्यातील आलियाचा लेकीसह व्हिडीओ व्हायरल

सध्या अनंत अंबानी आणि राधिका मर्चंट यांच्या प्री-वेडिंग सोहळ्याची चहूबाजूने चर्चा सुरू आहे. या प्री-वेडिंग सोहळ्यासाठी हॉलीवूडपासून, बॉलीवूड, दाक्षिणात्य कलाकार उपस्थित राहिले आहेत. याशिवाय उद्योग जगतातील दिग्गज मंडळींनी हजेरी लावली आहे. याचे फोटो, व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले आहेत. अशातच रणबीर कपूर व आलिया भट्टची लेक राहा कपूरच्या क्यूट व्हिडीओने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे.'इस्टंट बॉलीवूड' या इन्स्टाग्राम पेजवर गोंडस राहा कपूरचा व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओत, आलिया भट्ट राहाला कडेवर बसवून अनंत अंबानींशी भेट करून देताना दिसत आहे.

यावेळी मायलेकीने मॅचिंग कपडे घातलेले पाहायला मिळत आहे. या व्हिडीओत पुन्हा एकदा राहाचा क्यूट अंदाज दिसत आहे. राहाचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे.या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी भरभरून प्रतिक्रिया दिल्या आहेत. 'आलिया ही एक आई आहे, यावर विश्वास बसत नाहीये. ती स्वतः एका बाळासारखी दिसते', 'अनंत अंबानी खूप चांगल्या मनाचे व्यक्ती आहेत', 'ही छोटी आलिया किती क्यूट आहे', अशा अनेक प्रतिक्रिया या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी दिल्या आहेत.दरम्यान, अनंत अंबानी-राधिका मर्चंट यांच्या प्री-वेडिंगचा आज शेवटचा दिवस आहे. आज 'टस्कर ट्रेल्स' आणि 'हस्ताक्षर' हा कार्यक्रम आहे. 'टस्कर ट्रेल्स' हा आउटडोअर कार्यक्रम असून यात पाहुण्यांना जामनगर फिरवलं जाणार आहे. तर दुसरा कार्यक्रम भारतीय पेहरावात असणार आहे.



# मैदानात कधी परतणार शामी?

## वनडे विश्वचषकात सर्वाधिक विकेट शामीच्या नावावर

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**टीम इंडियाचा हुकुमी एक्का आणि प्रतिस्पर्धी गोलंदाजांना धडकी भरवणारा मोहम्मद शामी सध्या टीम इंडियापासून लांब आहे. शामीच्या पायावर शस्त्रक्रिया झाली असून सध्या तो रुग्णालयात दाखल असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. पण, चाहत्यांचा लाडका शामी मैदानात कधी परतणार याची सर्वचजण आतुरतेनं वाट पाहत आहे. आयपीएलचं काय होणार, तो खेळणार का? असे अनेक प्रश्न चाहत्यांच्या मनात आहेत. अशातच या सर्व प्रश्नांची उत्तरं तुम्हाला बीसीसीआयनं (BCCI) दिलेल्या एका अपडेटवरुन मिळतील.**



बीसीसीआयनं दिलेल्या माहितीनुसार, शामीच्या डाव्या पायाच्या घोट्याला दुखापत झाली होती. त्यावर 26 फेब्रुवारी 2024 रोजी यशस्वीरित्या शस्त्रक्रिया पार पडली. सध्या तो रुग्णालयात दाखल असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. तसेच, रुग्णालयातून डिस्चार्ज दिल्यानंतर मोहम्मद शामी रिहॅब प्रोसेस सुरू करणार आहे. त्यासाठी तो बंगळुरूतील क्रिकेट नॅशनल अकॅडमीत जाणार आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वीच शामीच्या पायावर शस्त्रक्रिया पार पडली. मोहम्मद शामीनं स्वतः सोशल मीडिया पोस्ट करत याबाबत माहिती दिली होती. तसेच, त्याला पूर्णपणे बरं होण्यासाठी आणखी काही काळ लागेल असं म्हटलं होतं. तसेच, शामी आगामी आयपीएल 2024 मध्येही दिसणार नाही. शामीचं आयपीएलमधून बाहेर जाणं हा गुजरात टायटन्ससाठी मोठा धक्का असल्याचं बोललं जात आहे. मोहम्मद शामीनं नोव्हेंबर 2023 मध्ये अखेरचा आंतरराष्ट्रीय सामना खेळला होता. वनडे विश्वचषकाचा अंतिम सामन्यात शामी खेळला होता. हा सामना ऑस्ट्रेलियानं सहा विकेटनं जिंकला होता. भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला होता. भारताने प्रथम फलंदाजी करताना 240 धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरदाखल ऑस्ट्रेलियानं 4 विकेटच्या मोबदल्यात 43 षटकात हे आव्हान पार केलं होतं. भारताकडून मोहम्मद शामीनं एक विकेट घेतली होती. वनडे विश्वचषकात सर्वाधिक विकेट घेण्याचा पराक्रम मोहम्मद शामी यानं केला होता. शामीनं 7 सामन्यात 24 विकेट घेतल्या. वनडे विश्वचषकानंतर मोहम्मद शामी दुखापतीमुळे भारतीय संघाबाहेर आहे. दुखापत असतानाही मोहम्मद शामी यानं भारतासाठी विश्वचषक गाजवला होता. सध्या सुरु असलेल्या इंग्लंडविरोधातील कसोटी मालिकेलाही तो मुकलाय. मोहम्मद शामी ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये क्रिकेटच्या मैदानावर कमबॅक करण्याची शक्यता आहे. स्टार गोलंदाज मोहम्मद शामी दुखापतीमुळे आयपीएलला मुकणार आहे. हा गुजरातसाठी मोठा धक्का मानला जातोय. गुजरातनं 2022 मध्ये आयपीएल पदार्पण केले.

### आयपीएल मध्येही दिसणार नाही

गेल्यावर्षी गुजरातला उपविजेतेपदावर समाधान मानवं लागलं. या दोन हंगमात मोहम्मद शामी यानं गुजरातकडून भेदक मारा करत विजयात मोलाचा वाटा उचललाय. पण आता दुखापतीमुळे मोहम्मद शामी आयपीएल स्पर्धेला मुकणार आहे.. दरम्यान, काही दिवसांपूर्वीच शामीच्या पायावर शस्त्रक्रिया पार पडली. मोहम्मद शामीनं स्वतः सोशल मीडिया पोस्ट करत याबाबत माहिती दिली होती. तसेच, त्याला पूर्णपणे बरं होण्यासाठी आणखी काही काळ लागेल असं म्हटलं होतं. तसेच, शामी आगामी आयपीएल 2024 मध्येही दिसणार नाही.

शामीचं आयपीएलमधून बाहेर जाणं हा गुजरात टायटन्ससाठी मोठा धक्का असल्याचं बोललं जात आहे. मोहम्मद शामीनं नोव्हेंबर 2023 मध्ये अखेरचा आंतरराष्ट्रीय सामना खेळला होता. वनडे विश्वचषकाचा अंतिम सामन्यात शामी खेळला होता. हा सामना ऑस्ट्रेलियानं सहा विकेटनं जिंकला होता. भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला होता. भारताने प्रथम फलंदाजी करताना 240 धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरदाखल ऑस्ट्रेलियानं 4 विकेटच्या मोबदल्यात 43 षटकात हे आव्हान पार केलं होतं. भारताकडून मोहम्मद शामीनं एक विकेट घेतली होती.

# हजारो लोकांनी मला रोखण्याचाही प्रयत्न केला

## चाहत्यांचा पाठिंबा मिळत राहील, मनोरंजन करण्याचा प्रयत्न करेन

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**हार्दिक पांड्या आता IPL 2024 मध्ये थेट खेळताना दिसणार आहे. गेल्यावर्षी 19 ऑक्टोबर रोजी पुण्यात झालेल्या विश्वचषकात बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात गोलंदाजी करताना हार्दिकला दुखापत झाली होती. यामुळे तो ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या घरच्या टी-20 मालिका, दक्षिण आफ्रिका मालिका आणि अफगाणिस्तानविरुद्धच्या घरच्या टी-20 मालिकेतही दिसला नाही. गेल्यावर्षी हार्दिकला मुंबई इंडियन्सने गुजरात टायटन्सकडून ट्रेड केले होते. मुंबई इंडियन्सचा कर्णधार असेल. एका मुलाखतीत हार्दिकने त्याच्याशी संबंधित अनेक गुपिते उघड केली आहेत.**

हार्दिक पांड्याने YOUTUBER UK 07 RIDER शी बोलला. हार्दिकने सांगितले की तो एक घरातील मुलगा आहे. घरात राहायला आवडते. प्रसारमाध्यमांमध्ये येणे आवडत नाही. पांड्या म्हणाला की, एक वेळ अशी होती की मी 50 दिवस घराबाहेर पडलो नाही. मला घरची लिफ्टही दिसली नाही. माझे स्वतःचे होम जिम, होम थिएटर आहे. मला आवडणाऱ्या गोष्टी माझ्या घरात आहेत.





हार्दिकने त्याच्या प्रवासाबद्दलही सांगितले. आपल्या संघर्षाबद्दल तो म्हणाला की, तुमच्या कामाशी प्रामाणिक राहा, तुमच्यात आवड असेल तर तुम्ही ते थांबवू शकत नाही, मी सुद्धा कोणाला रोखू शकत नाही. हजारो लोकांनी मला रोखण्याचाही प्रयत्न केला. मात्र, असं झालेलं नाही. रॅपिड फायर प्रश्नोत्तरातही अनेक गोष्टी सांगितल्या. तो म्हणाला की त्याला बॉब मार्ले आवडतो. त्याचवेळी तो म्हणाला की रॅप अजिबात आवडत नाही.हार्दिकने असेही सांगितले की, सुरुवातीला जेव्हा त्याला आयपीएलमध्ये 10 लाख रुपयांचे करार मिळायचा. पण आयपीएलमधला सामनावीराचा पुरस्कार एखाद्या व्यक्तीला दिला जातो, असं त्याला वाटत होतं, पण तसं नाही. ते संपूर्ण टीममध्ये वितरीत केले जाते. जेव्हा त्याला विचारण्यात आले की तो माजी गोलंदाज कोणता आहे ज्याचा सामना करायला त्याला आवडेल? यावर तो म्हणाला, बरं, कोणीही नाही कारण प्रत्येकजण धोकादायक होते. शेन वॉर्न आणि शोएब अख्तर हे खूपच धोकादायक होते. मुंबई इंडियन्सच्या चाहत्यांबाबत हार्दिक म्हणाला की, मला आशा आहे की पाठिंबा मिळत राहील. तो लोकांचे मनोरंजन करण्याचा प्रयत्न करेल. हार्दिकच्या सुपरकारच्या टेस्ट राईडचे काही फोटो व्हायरल झाले होते, त्यावरही तो या मुलाखतीत म्हणाला की, मी मीडियामध्ये कमेंट करत नाही, मी कधीच केले नाही, त्यामुळे मला काही फरक पडत नाही.हार्दिक पांड्याने आतापर्यंत 11 कसोटी सामन्यांमध्ये 532 धावा केल्या आहेत. या सामन्यांमध्ये 17 विकेट्स घेतल्या आहेत.

### पांड्याची आंतरराष्ट्रीय कारकीर्द

पांड्याचा शेवटचा कसोटी सामना 2018 साली इंग्लंडविरुद्ध होता.हार्दिक कसोटी क्रिकेट खेळत नाही. पांड्याने 86 एकदिवसीय सामन्यांमध्ये 1769 धावा आणि 84 विकेट घेतल्या आहेत. याशिवाय त्याने 92 टी-20 सामन्यांमध्ये 1348 धावा आणि 73 विकेट घेतल्या आहेत. तर आयपीएलमध्ये पंड्याने 123 आयपीएल सामन्यांमध्ये 30.38 च्या सरासरीने 2309 धावा आणि 53 विकेट घेतल्या आहेत. हार्दिक पांड्या आता IPL 2024 मध्ये थेट खेळताना दिसणार आहे. गेल्यावर्षी 19 ऑक्टोबर रोजी पुण्यात झालेल्या विश्वचषकात हार्दिकला दुखापत झाली होती. यामुळे तो ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या घरच्या टी-20 मालिका, दक्षिण आफ्रिका मालिका आणि अफगाणिस्तानविरुद्धच्या घरच्या टी-20 मालिकेतही दिसला नाही.